सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०१/कोषा प्रशा-५, दि. १३/०३/२०२६.

**विषय** :- आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागारे / उपकोषागारे यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०१/कोषा प्रशा-५, दि. १३/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३१३१५४९५४७१०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Kalpana Kisan Lokhande
Date: 17-03-2026
12:20:41

( कल्पना लोखंडे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागारे / उपकोषागारे यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण -२०२६/प्र.क्र. ०१ / कोषा प्रशा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १३ मार्च, २०२६.

**शासन परिपत्रक:-**

वित्तीय वर्षाअखेर दरवर्षी मार्च महिन्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात पूरक मागणीद्वारे व सुधारित अंदाजपत्रकाद्वारे विविध विभागांना निधी उपलब्ध करून दिला जातो. सदर उपलब्ध झालेला निधी दिनांक ३१ मार्च अखेर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार / उपकोषागार कार्यालये येथे देयके सादर करुन खर्च करणे अनिवार्य असते. कोषागारात मार्च अखेरीस मोठ्या प्रमाणावर सादर होणा-या देयकांचा ओघ लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर मार्च महिन्यात कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालये, आहरण व संवितरण अधिकारी तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / सर्व जिल्हा कोषागार कार्यालये व उप कोषागार कार्यालये यांना खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

| सूचना | करावयाची कार्यवाही |
|---|---|
| १) **दि.२८.०३.२०२६ (शनिवार) , दि.२९.०३.२०२६ (रविवार) व दि.३१ मार्च, २०२६(महावीर जयंती) या सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशीचे कामकाजाचे स्वरूप.** | मार्च अखेरीस यावर्षी **दि.२८.०३.२०२६** रोजी शनिवार (सार्वजनिक सुट्टी), **दि.२९.०३.२०२६** रोजी रविवार (सार्वजनिक सुट्टी) आहे. **उपरोक्त दिवशी अधिदान व लेखा कार्यालय, जिल्हा कोषागारे व उपकोषागारे देयके स्विकृतीसाठी सुरू राहतील. तरी आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर दिवशी देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.**<br>दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी मंगळवार (महावीर जयंती) सार्वजनिक सुट्टी आहे. तथापि या दिवशी अधिदान व लेखा कार्यालय, जिल्हा कोषागारे/ उपकोषागारे कामकाजासाठी सुरू राहणार आहेत. तसेच दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी ई-कुबेर प्रणाली देखील शासकीय व्यवहारासाठी सुरू राहणार आहे. तरी मार्च अखेरीस शासनाचा निधी अखर्चित राहू नये यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी रात्री उशिरापर्यंत चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दिवशी देयक स्विकृती व |

| | |
|---|---|
| | ई-कुबेरद्वारे (अत्यंत अपवादात्मक प्रकरणी धनादेश) प्रदानाची कामे पूर्ण करता येतील. |
| २) **उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२६ रोजी सांयकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करुन जिल्हा कोषागारात सादर करणे.** | उप कोषागार कार्यालयामध्ये प्राप्त होणारी देयके, त्या देयकांवर उप कोषागार कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीस लागणारा अवधी व बँकेच्या कामाचा कालावधी पाहता उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करण्यात येईल. ( कोकण भवन, उपकोषागार कार्यालय वगळून) |
| ३) **दि. ३१ मार्च, २०२६ रोजी शासकीय प्रदाने धनादेशा ऐवजी e-kuber द्वारे करण्यास मंजुरी देणे** | शासकीय प्रदाने केवळ e-kuber payment mode द्वारेच करण्यात यावीत. अत्यंत अपवादात्मक प्रकरणी (जसे की, न्यायालयीन आदेशान्वये न्यायालयात जमा करण्यासाठी धनादेशाद्वारे करावयाची प्रदाने इ.) धनादेशाद्वारे प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येईल. |
| ४) **काही विशिष्ट प्रकारची देयके दि. २५ मार्च, २०२६ पर्यंत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करणे.** | १) प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध असलेल्या अनुदानाची खालील बाबींची देयके दि. २५ मार्च, २०२६ पर्यंतच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करण्यात यावीत. **दि. २५ मार्च, २०२६** नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत. त्यानंतर अशी देयके पुढील आर्थिक वर्षाच्या अनुदानातून काढण्यात यावीत.<br>i. प्रवास भत्ता देयके,<br>ii. आस्थापना विषयक पुरवणी देयके,<br>iii. वैदयकीय खर्च प्रतिपूर्ती देयके<br>तथापि, उपरोक्त बाबींसाठी पुरवणी मागण्या (मार्च-२०२६) व सुधारीत अंदाजपत्रकानुसार किंवा केंद्र शासन / इतर बाहय संस्था यांचेकडून अनुदान मंजूर झाले असेल, तर मात्र सदर देयके दि. २५ मार्च, २०२६ नंतर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारण्यात येतील. |

| | |
|---|---|
| | २) संक्षिप्त देयके **दि. २५ मार्च, २०२६** नंतर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.<br>३) तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२५ /प्र.क्र.९३ /कोषा प्रशा.५, दि. ०३ फेब्रुवारी, २०२६ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. |
| ५) **प्रपत्र बिजक (Proforma invoice) जोडून सादर होणा-या देयकांबाबत.** | मार्च महिन्याच्या अखेरीस उपलब्ध निधी खर्च करण्याचे हेतूने माल/वस्तू प्राप्त झालेल्या नसताना देखील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्रपत्र बिजक (Proforma Invoice) जोडून महाराष्ट्र कोषागार नियम नमुना ३१ अथवा २८ मध्ये देयके सादर केली जातात.वस्तुतः प्रपत्र बीजक हे फक्त संक्षिप्त देयकांसोबत जोडणे अभिप्रेत आहे.<br>महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ३०२ व ३०३ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ मधील परिशिष्ट एक मधील विवरणपत्र दोन मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठीच संक्षिप्त देयकांवर रक्कम काढता येते.त्यासाठी संक्षिप्त देयकांसोबत प्रपत्र बीजक जोडणे आवश्यक आहे.<br>आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रपत्र बिजक (Proforma Invoice) जोडून महाराष्ट्र कोषागार नियम नमुना ३१ अथवा २८ मध्ये देयके सादर केली असतील, तर अशी देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी पारित करु नयेत.<br>मात्र पुरवठादारांकडून खरेदी केलेल्या वस्तूंचा पुरवठा करण्यात आला असेल व महाराष्ट्र कोषागार नियम नमुना ३१ अथवा २८ सोबत अंतिम देयके / Final Bill /नियमित प्रमाणके/ पावत्या जोडल्या असतील तरच व देयक परिपूर्ण असल्यास अशी देयके पारित करण्यात यावीत. |
| ६) **नियंत्रक अधिका-यांनी पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान त्वरीत बिम्स (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध करुन देणे.** | शासनाकडून विविध विभागांना आठमाही सुधारित अंदाजपत्रकानुसार तसेच पुरवणी मागण्यांद्वारे अनुदान मंजूर केल्यानंतर प्रशासनिक विभाग व विभाग प्रमुखांकडून बिम्स ( BEAMS) |

| | |
|---|---|
| | प्रणालीवर उशिराने आहरण व संवितरण अधिका-यांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, त्यानंतर देयके तयार करुन, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/ जिल्हा कोषागार कार्यालये/ उप कोषागार कार्यालये यांना सादर करणे, इत्यादी कार्यवाही करण्यास विलंब होतो. वाढीव भारामुळे दि. ३१ मार्च रोजी बिम्स (BEAMS) प्रणाली, बील पोर्टल तसेच ट्रेझरी नेट प्रणाली यावर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता असल्याने, त्याकरिता सर्व विभागांनी/नियंत्रण अधिकारी यांनी सुधारीत अर्थसंकल्प / पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान बिम्स (BEAMS) प्रणालीवर त्वरित उपलब्ध करुन दयावे. |
| ७) **प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे यांनी मार्च महिन्यातील कामकाजाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.** | (अ) माहे मार्च २०२६ मध्ये शासन तसेच संचालनालय स्तरावरुन प्राप्त होणाऱ्या सूचना, परिपत्रके, शासन निर्णय यांची अंमलबजावणी जिल्हा कोषागार / उपकोषागार कार्यालये यांचे कडून काटेकोरपणे केली जाईल, या दृष्टीने नियंत्रण ठेवावे.<br>(आ) जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालयांतील कामकाज करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे पडत असेल अशा ठिकाणी योग्य ते नियोजन करुन सह संचालक कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.<br>(इ) मार्च महिन्यातील कामाचा निपटारा करण्यासाठी जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयांतील अधिका-यांची आढावा बैठक आयोजित करावी. त्यामध्ये जिल्हा कोषागार कार्यालयांनी मांडलेल्या समस्यांबाबत मार्गदर्शन करावे आणि समुचित उपाययोजना कराव्यात.<br>(ई) मार्च अखेरीस केल्या जाणा-या कोषागारातील कामकाजावर नियंत्रण ठेवण्यात यावे व त्याचा प्रगती अहवाल संचालनालय, लेखा व कोषागारे कार्यालयास वेळोवेळी सादर करावा. |
| ८) **आहरण व संवितरण अधिकारी यांनी मार्च , २०२६ अखेर अनुदान आहरित करावयाच्या कार्यवाही बाबत.** | मार्च, २०२६ अखेर प्राप्त झालेल्या अनुदानाची देयके संबंधित अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार/ उपकोषागारात सादर करुन अनुदान आहरित करुन घ्यावयाची सर्वस्वी जबाबदारी ही आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यांनी विहित मुदतीत देयके सादर न केल्यास व त्यामुळे |

| | |
|---|---|
| | दि. ३१ मार्च अखेर अनुदान व्यपगत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये /उपकोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत. |
| **९) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालये यांनी आक्षेपित केलेली देयके दि. २५ मार्च, २०२६ पर्यंत फेरसादर करणे.** | अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये/ उप कोषागार कार्यालये यांनी माहे एप्रिल, २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत किंवा त्या पूर्वी आक्षेपित केलेली आणि दिर्घ काळापासून फेरसादर न झालेली सर्व देयके संबंधित आहरण व संवितरण अधिकारी दि.२५ मार्च, २०२६ पर्यंतच फेर सादर करु शकतील. दि. २५ मार्च, २०२६ नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत. |
| **१०) जिल्हा कोषागार कार्यालय स्तरावर सादर होणे आवश्यक असणारी देयके उप कोषागार कार्यालय स्तरावर सादर न करणे.** | सुधारीत अंदाजपत्रक व पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदानातून वैयक्तिक लाभाची मोठ्या रकमेची देयके (महसूल विभाग, कृषी विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग इत्यादी विभागांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांकडून तालुका स्तरावर अनुदान वाटप करुन त्याबाबतची देयके) उप कोषागार कार्यालयांमध्ये वर्ष अखेरीस सादर केली जातात. उप कोषागार कार्यालयातील पुरेशा मनुष्यबळाअभावी अशा देयकांची छाननी करण्यावर मर्यादा येतात. त्यामुळे अशी देयके आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपकोषागार कार्यालयात सादर न करता जिल्हा कोषागार कार्यालयामध्येच सादर करावीत. उपकोषागार अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना याबाबत लेखी सूचना दयाव्यात. |
| **११) सायबर कोषागार कार्यालयाने करावयाच्या कार्यवाही बाबत.** | महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय, मुंबई यांच्याकडे सादर होणा-या देयकांबाबत (आदान / प्रदान ) भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) केंद्र शासन (Central Government ) व सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन (PFMS) प्रणाली यांनी दि.३१.०३.२०२६ च्या अनुषंगाने वेळोवेळी घोषित केलेले आदेश / परिपत्रके बंधनकारक राहतील. |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०३१३१५४९५४७१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.03.13 15:51:56 +05'30'

**( रविकुमार लिंगनवाड )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण , अल्पसंख्यांक विकास व औकाफ.) यांचे सचिव
५. सर्व मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधान सभा / विधान परिषद व संसद सदस्य
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख
१०. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२. महाराष्ट्र, नागपूर
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२४. सर्व विभागीय आयुक्त
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे /नाशिक/छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३०. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
३१. प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/ पुणे/नाशिक /छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे /पुणे /नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३४. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३५. निवड नस्ती- कोषा प्रशा-५